INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES
( Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal )
DOI : 03.2021-11278686 ISSN : 2582-8568 IMPACT FACTOR : 7.560 (SJIF 2024)

# महाराष्ट्रातील विकासाच्या राजकारणाची संकल्पना
# (Politics Concept of Development in Maharashtra)

**श्री. अतुल गणेश साळुंके**

संशोधक विद्यार्थी,

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,

छत्रपती संभाजीनगर

**DOI No.** 03.2021-11278686 **DOI Link ::** https://doi-ds.org/doilink/12.2024-65557373/IRJHIS2412014

**प्रस्तावना :**

१५ ऑगष्ट १९४७ मध्ये भारताला स्वातंत्र्य मिळाले.अनेक संस्थानामध्ये विभागलेला हा भाग तत्कालीन गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांनी एकत्र केला. नंतरच्या काळात संयुक्त महाराष्ट्र व्हावा यासाठी मोठी चळवळ झालीआणि यातून १ मे १९६० मध्ये संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती झाली. स्वतंत्र राज्य निर्माण झाल्यानंतर या राज्याचा विकास हा मोठा प्रश्न सर्वांसमोर होता.जर या राज्याचा विकास करावयाचा असेल तर येथील राजकीय नेतुत्वांनी प्रादेशिक समता अंगीकारून आपले कार्यकुशल नेतृत्व सिद्ध करावयास पाहिजे होते. राज्याचा विकास हा प्रादेशिक समतोल ठेऊन केला गेला पाहिजे. फक्त पुणे, मुंबई आणि नागपूर या भागाचा विकास म्हणजे संपूर्ण महाराष्ट्राचा विकास हे गृहीत धरून चालणार नाही. आज मराठवाड्यातील हिंगोली, परभणी,उस्मानाबाद असे अनेक जिल्हे या राज्यात आहे. जेथे विकासाचा मोठा अनुशेष अजूनही आहे सबंध महाराष्ट्राचा विकास घडवून आणावयाचा असेल तर या भागात विकासाचे राजकारण होणे अधिक गरजेच आहे. राजकारणाच्या दृष्टीकोनातून विकासाचे राजकारण हि चांगली संकल्पना आहे आणि जातीय राजकारण हे राजकारणाच्या दृष्टिकोनातूनही घातक असते. प्रस्तुत संशोधन लेखामध्ये महाराष्ट्राच्या विकासाचे राजकारणाचा आढावा घेतला आहे. यासोबतच राजकारणातील ज्या नवीन संकल्पना आणि आव्हाने यावर प्रश्न आले आहे.त्यावर चर्चा केलेली आहे.

विकासाचे राजकारण या विषयी आजपर्यंत अनेक लेखकांनी तसेच संशोधकांनी संशोधनपर लेख लिहिलेले आहेहे लेख लेखन करत असतांनी काहींनी विकासावर भर दिला.काहींनी तुलनात्मक विचार केला. तर काहींनी पाश्चात्मक तुलनात्मक विचार केला. प्रस्तुत संशोधनामध्ये विकासाच्या राजकारणाचे महत्व, या विकासाच्या राजकारणात असलेले आव्हाने, विकासाच्या राजकारणाची गरज आणि विकासाच्या राजकारणाचे बदलते स्वरूप या बाबींचे विवेचन केलेले आहे.सदरील संशोधन करतांना संशोधनात्मक वर्णनात्मक पद्धतीचा वापर केलेले आहे. या मध्ये सद्यकालीन राजकारणाचा चिकित्सक अभ्यास केला आहे. तसेच सत्तर आणि ऐंशीच्या राजकारणाच्या काही बाबी तपासलेल्या आहे.

**उद्देश :**

१. महाराष्ट्रातील विकासाच्या राजकारण या संकल्पनेचा अभ्यास करणे.

२. सद्यस्थितीतील राजकीय नेतृत्वांची राजकीय स्तर अभ्यासाने

३. राजकारणापुढील आव्हाने तसेच प्रश्न याचे अध्ययन करणे

**महाराष्ट्रातील राजकारण :**

मराठी भाषा बोलणाऱ्यांसाठी संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती व्हावी ही कित्येक वर्षाची मागणी होती.यासाठी १०७ जणांनी आपले प्राण दिले. (दिव्य मराठी २०२४) शेवटी १ मे १९६० मध्ये संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती झाली या काळात जात, धर्म, भाषा, प्रादेशिकवाद या विचारातून राजकारण होत असत. विकासाचा मुद्दा बाजूला सारून धर्माने त्याची जागा घेतली होती महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. तेव्हा प्रांतनिहाय संतुलन विकासाची समस्या हा घटक अत्यंत संवेदनशील होताविदर्भ, मराठवाडा या भागाच्या विकासाची मोठी समस्या होती. नागपूर करार या सारख्या उपयोजना या भागासाठी करण्यात आल्या. परंतु त्याचा परिणाम या भागाच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने फारसा झाला नाही. या नागपूर कराराचे पालन तत्कालीन शासनकर्त्यांनी केले नाही असे दांडेकर समितीच्या अहवालात निदर्शनास आले. या समितीच्या शिफारसी आजही कागदामध्ये पडून आहेत.

महाराष्ट्र स्थापन झाल्याच्या सुरुवातीच्या काळात राजकीय पक्षात ध्येयवाद आणि शिष्टाचार प्रकर्षाने जाणवत असत. त्यावेळच्या राजकीय नेतृत्वांना सामाजिक प्रश्नांची जाण अधिक असायची पक्षाशी एकनिष्ठ राहून जो पक्षाला आपले सर्वांगीण योगदान देईल. अशा व्यक्तीकडील धनसंपदेचा विचार न करता पक्षामध्ये उच्च स्थान त्याला मिळत असत. याचे उदाहरण आपण मराठवाड्यातील विनायकराव पाटील तसेच शंकरावर चव्हाण यांचे पाहू शकतो १९६० आणि १९७० च्या काळात पैशापेक्षा पक्ष संघटनेला जास्त महत्व होते. १९७० पर्यंत विकासाच्या राजकारणापेक्षा जातीचे, धर्माचे राजकारण करणे हि एक समस्या होती. राजकारणात जात, धर्म, समाज या गोष्टींना अधिक प्राधान्य होते. यामुळे महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाचा मोठा प्रश्न समोर येऊन ठाकला होता. परंतु खरे विकासाचे राजकारण १९७० ते १९८० च्या दशकात सुरु झाले. जातीय संकल्पना राजकारणात मागे सारून विकासाचे राजकारण समोर आले होते. राजकीय नेतृत्व हे विकासावर निवडल्या जाऊ लागले. या काळात महाराष्ट्राच्या विकासासाठी अनेक योजना कार्यान्वित झाल्या. १९६० ते १९८० अशी दोन दशके कॉंग्रेसचे वर्चस्व आणि डाव्यांचा क्षीण प्रतिकार यावर आधारले होते १९७७ मध्ये कॉंग्रेस मध्ये पडलेली फुट शरद पवार यांचा पुलोदचा प्रयोग सोडला तर हा काळ कॉंग्रेसचाच होता. (एरंडे,व्ही.२०२०) १९६९ मध्ये कॉंग्रेस दोन गटात विभागल्या नंतर इंदिरा गांधी यांनीही घटक राज्यातील राजकारणात लक्ष दिले तेव्हापासून कॉंग्रेसचे दोन गट झाले याचा फायदा घेऊन शरद पवार यांनी महाराष्ट्रातील राजकारणात आपला स्वतःचा पक्ष स्थापन केला.(एरंडे,व्ही.२०२०) यामुळे कॉंग्रेसमध्ये असलेले बहुसंख्य मराठा नेतृत्वाचे दोन गट झाले.यामुळे १९९० नंतर कॉंग्रेस पक्षाला उतरती कळा लागलीयासाठी प्रमुख कारण ठरली महाराष्ट्रातील भाजप-सेना युती आणि शरद पवार याची राष्ट्रवादी, १९९९ मध्ये शरद पवार यांनी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष स्थापन केला यानंतरही अधिक काळ राष्ट्रवादी ला सोबत घेऊन कॉंग्रेसची सत्ता महाराष्ट्रात होती परंतु कॉंग्रेस नेत्यांवर झालेले भ्रष्टाचाराचे आरोप,पक्ष बांधणीतील हलगर्जीपणा, ढासाळलेली नैतिकता, पक्षीय स्थित्यंतरे या कारणांमुळे२०१४ मध्ये नरेंद्र मोदी यांची प्रचंड लाट भारतात आली महाराष्ट्रात सेना-भाजपची सत्ता आली. नंतरच्या काळात कोणी विचारही करू शकत नाही, असे सेना-राष्ट्रवादी कॉंग्रेसकॉंग्रेस सरकार काही काळ आले परंतु या नंतरच्या काळात राजकीय सत्तेसाठी कोणत्याही मार्गाचा अवलंब महाराष्ट्रात पहावयास मिळाला. राजकीय सत्ता यास अनन्यसाधारण महत्व प्राप्त होऊन. सत्तेसाठी

अनेक पक्ष विभागले गेले. सत्ता हे एक आपल्यावरील आरोप मिटवण्याचे साधन बनले. यातून महाराष्ट्रातील राजकारणाची खालावलेली परिस्थिती समोर येते. तसेच राजकीय नेतृत्वाच्या विचारात झालेले लोकशाहीसाठी घातक विचार प्रकर्षाने समोर येतात. त्यामुळे आज सत्ता केंद्रित राजकारणापेक्षा महाराष्ट्रासाठी विकास केंद्रित राजकारणाची गरज वाढत चालली आहे.

**विकासाचे राजकारण :**

विकासाचे राजकारण म्हणजे राजकीय नेतृत्वांनी आपला स्वार्थ बाजूला ठेऊन विकास योजनांचा प्राधान्याने विचार करणे.जगामध्ये ज्या ज्या देशामध्ये विकासाचे राजकारणास प्रोत्साहन मिळाले.त्या देशाची भरभराट झालेली आपणास पाहावयास मिळते.अमेरिका, जपान, रशिया या देशांनी याच विकासाच्या राजकारणातून स्वतःला महासत्ता केल्याचे दिसते ज्या काळात विकासाचे राजकारण झाले. त्याकाळात देश आर्थिकदृष्ट्या शक्तिशाली झाल्याचे दिसते.

भारताचा विचार केल्यास आज भारतात प्रादेशिक विकासाची तफावत मोठ्या प्रमाणात निदर्शनास येते.देशात ज्यावेळी विकासाचे राजकारण झाले.तेव्हा देशाचा विकास झाला.अर्थमंत्री डॉ.मनमोहनसिंग यांनी जागतिकीकरणाचे दरवाजे खुले करून देशाला आर्थिक संकटातून बाहेर काढलेभारतातील राज्यांचा विचार केल्यास बिहार, राजस्थान सारखे अनेक राज्य आजही म्हणावे तसे समृद्ध नाही. या राज्यांच्या बाबतीत केंद्रात किंवा राज्यात विकासाचे राजकारण झाले नाही.असेच म्हणावे लागेल.विकासाचे राजकारण हे त्या त्या भागातील नेतृत्वांवर अवलंबून असते नेतृत्व प्रभावशाली असेल तर तो प्रदेश नक्कीच विकासाच्या प्रवाहात येतो. आज भारतातील गुजरात,दिल्ली अशा राज्यांमध्ये विकासाचे राजकारण होत आहे.असे दिसते. यामुळे आपण जर पहिले तर मोठ मोठे व्यावसायिक आपले उद्योग उभारणीसाठी गुजरात सारख्या राज्याला अधिक प्राधान्य देत आहे. याचे कारण सत्ताधारी नेतृत्वांवर जरी कोणी बोट ठेवत असेल तरी अशा राज्यामध्ये काही ठराविक काळात प्रगतीचे राजकारण होऊन ते राज्य विकसित झाले आहे. याचा फायदा त्यांना विकासाची उच्च पातळी पर्यंत पोचण्यासाठी होत आहे. १९७० पर्यंत महाराष्ट्रात राजकीय नेतृत्व जातीपातीच्या राजकारणावर निवडून येत होते. धर्माचा,जातीचा आधार घेऊन हे नेतृत्व सत्तेत येऊ लागली. मात्र १९७० नंतर काही काळ विकासाचे राजकारण या राज्यात होऊ लागले. लोकांचे विचार बदलून लोक विकास करणाऱ्या नेतृत्वांना निवडून देऊ लागले परंतु सद्यस्थितीचा विचार केल्यास आज पुन्हा या महाराष्ट्रात पूर्वीचीच परिस्थिती निर्माण झाली आहे. धर्मावर,जातीपातीवर विसंबून असलेले राजकारण आज पाहावयास मिळत आहे जर राष्ट्राचा विकास साधावयाचा असेल तर विकासाचे राजकारण होणे गरजचे आहे. आजच्या राजकारणात झालेले विशिष्ट बदल तसेच राजकीय विचारांची हेळसांड यामुळे प्रस्तुत लेख महत्वाची भूमिका बजावतोविकासाच्या राजकारणाविरोधी अनेक प्रश्न आज समोर येत आहे. अनेक आव्हाने यामध्ये निर्माण झाली आहे. ते खालीलप्रमाणे सांगता येतील.

**विकासाच्या राजकारणापुढील आव्हाने :**

भविष्यातील लोकशाही अधिक विश्वसनीय बनवायची असेल तर विकासाचे राजकारण गरजचे आहे. परंतु हे राजकारण करत असतांनी अनेक आव्हाने समोर आले आहेत. यामध्ये सत्ता प्राप्तीसाठी कोणत्याही मार्गाचा वापर सद्याचे नेतृत्व करतांनी दिसते. राजकीय नेतृत्व पक्षाचे विचार सरळ पायाखाली तुडवत आहे. ज्या पक्षाची सत्ता तो राजकीय नेतृत्वाचा पक्ष हि परिस्थिती निर्माण झाली आहे. अशा मोठ्या समस्या विकासाच्या राजकारणापुढे येऊन ठाकल्या आहे. आज सबंध महाराष्ट्रातील राजकारणाचा अभ्यास केल्यास असे आढळून येते कि, कार्यकुशल नेतृत्वाला संधी देण्यापेक्षा जातीचा आधार घेऊन कोणते नेतृत्व निवडून येईल याचाच विचार प्रत्येक पक्ष करत आहे यामुळे जातीय राजकारणाची तीव्रता या राज्यामध्ये फोफावली आहे. वेगवेगळ्या जातीविरोधी असंवेदनशील भाष्य करून जातीजातीत तेढ

निर्माण करायचे काम होत आहे. एका विशिष्ट मतदार संघात ज्या जातीची जनसंख्या जास्त त्याच जातीचा उमेदवार पक्षाकडून दिला जातो यामुळे हे विकासाच्या राजकारणास नक्कीच बाधक आहे. सरकार बदलल्यानंतर आधीचे निर्णय फिरवणे, जुन्या योजना नव्याने सुरु करणे किंवा स्थगित करणे हे प्रकार घडतांनी दिसतात मतदान हा प्रमुख उद्देश समोर ठेऊन असंख्य घोषणा मतदानापूर्वी देण्यात येतात सरकार आल्यावर त्याची पाच वर्ष जनता वाट बघत असते. मतदानाआधी घोषणा देऊन विरोधी पक्षाची सत्ता आल्यास त्यांनी त्या योजनात बदल केला. कदाचित हे एक वेळ ठीक आहे. परंतु आपलेच सरकार आल्यानंतर आपणच आखलेल्या योजनांमध्ये बदल करणे. हे लोकशाहीसाठी कसे हिताचे ठरेल. त्यामुळे हि परिस्थिती बदलणे आज महाराष्ट्राच्या राजकीय दृष्ट्या अगत्याचे आहे यासाठी उपयोजनात्मक पाऊले उचलणे गरजेचे आहे.

**उपाययोजना :**

सद्यस्थितीतील राजकारणातील एकंदरीत परिस्थिती बघता राजकारणाची परिस्थिती खालावलेली दिसून येते. स्वातंत्र्यानंतर भारताने लोकशाही शासन पद्धतीचा स्वीकार केला. हि लोकशाही शासन पद्धत प्रभावी पणे टिकून राहावी. त्यादिशेने पाऊले उचलणे गरजेचे आहे.

विकासाचे राजकारण होण्यासाठी पक्षामध्ये तसेच राजकीय नेतृत्वांमध्ये नैतिकता कशी आणता येईल यासाठी प्रयत्नकरणे गरजेचे आहे. ज्या नेत्यामध्ये विकासाची दूर दृष्टी असेल अशाच नेत्यांना राजकारणामध्ये लोकांनी तसेच राजकीय पक्षाने संधी देणे गरजेचे आहे. ज्या नेत्यांमध्ये जनकल्याणाची भावना आहे. संकुचित वृत्तीला बाजूला सारून जे नेते फक्त विकासाच्या राजकारणावर विश्वास ठेवतात. अशी नेतृत्व सत्तेवर येणे महत्वाचे आहे.

जेवढी तत्परता नेतृत्व दाखवते.तेवढीच तत्परता जनता दाखवते का याचाही विचार जनतेने केला पाहिजे. विकासाचे राजकारण झाले पाहिजे.परंतु कोठेतरी जनमत याचा स्वीकार करत नाही. मग यामध्ये प्रश्न पडतो.लोकांना जातिवाद पाहिजे कि, लोक जातीमध्ये गुरफटले आहे. यामुळे ते विकासाचे राजकारण करण्यास संधी कशी देतील यासाठी जनमतांनी या जातीत गुरफटलेल्या राजकारणाचा विरोध करून जे नेतृत्व आपल्या प्रदेशाचा विकास करेल. त्या नेतृत्वाला संधी दिली पाहिजे

नेतृत्व हि संकल्पना सर्वसमावेशी आहे परंतु आपल्याच मतदार संघाचा विकास झाला पाहिजे या संकुचित वृत्तीचा नेतृत्वांनी बदल केला पाहिजे. समाज हा नेतृत्वावर विसंबून असतो जर नेतृत्वांनी जातीय राजकारणापलीकडे विचार केला. तर जनताही त्यासाठी तेवढाच प्रतिसाद देते. यासाठी राजकीय नेतृत्वांनी आपला आदर्श येणाऱ्या तरुण नेतृत्वासमोर ठेवणे अगत्याचे ठरते.

**निष्कर्ष :**

अशाप्रकारे या परिस्थितीमुळे विकासाचे राजकारण हि संकल्पना शक्य नाहीयेती जर साध्य करायची असेल तर खालीलप्रमाणे आपणास बदल करावे लागेल.

१. ज्या नेत्यामध्ये दूरदृष्टी दिसेल, अशाच नेत्यांना राकारणात संधी दिली पाहिजे.

२. यासाठी मतदारांनीही विकासावर भर देणाऱ्या सक्षम नेतृत्वांना निवडून द्यावे

३. राजकीय नेतृत्वांनी आपले विकासात्मक विचार सर्वत्र मांडले पाहिजे

४. जनतेनेही विकासासाठी तेवढाच हातभार नेतृवांना लावला पाहिजे.

५. काही नेतृत्व धर्माच्या, जातीच्या नावाखाली सत्तेत येतात. अशा नेतृत्वांना लोकांनी संधी देता कामा नये.

**समारोप :**

राजकारणाची खालावलेला स्तर तसेच विकासाच्या राजकारणाचा अभाव यामुळे जनतेला अनेक समस्यांना सामोरे जावे लागते.एकदा पद मिळाल्यानंतर जनतेकडे दुर्लक्ष करणे हि बाब नेतृत्वाला न शोभणारी आहे.राज्याच्या विकासाच्या दृष्टीने हे काम कोणा एकट्याचे नाही. यासाठी सर्व नेतृत्वांनी तसेच जनतेने विकासाच्या राजकारणाची कास धरणे राज्याच्या हिताच्या दृष्टीने गरजेचे आहे.यामुळेच विकासाच्या राजकारणास नक्कीच चालना मिळेल यात शंका नाही

**संदर्भ ग्रंथ:**

१.विकासाचे राजकारण Retrieved from https://marathi.indiatimes.com/editorial/samwad/article-on-politics-of-development-and-denigration-of-democracy

२.पाटील, ग.(२०२१) राजकारणात यशस्वी व्हा, orchid publication. छ.संभाजीनगर

३.मुजुमदार, प्र.(२०२२). हिंदुत्ववादी राजकारणाचा पाऊलखुणा,लोकवाङ्मय प्रकाशन, पुणे.

४.पळशीकर, सु.(२०१३) राजकारणाचा ताळेबंद, साधना प्रकाशन. पुणे.

५.बोरीकर, दि.(२०१३) लीडरशिपचे महत्व,साकेत प्रकाशन, छ.संभाजीनगर.

६.उत्पल, व.(२०२३). लोकशाहीच्या हत्येसाठी, मेहता प्रकाशन, पुणे.

७.महाराष्ट्रातील सहा दशकातील वाटचाल. Retrieved from https://www.aksharnama.com/client/article